# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 01/03/2024

| अ. क्र | पो.स्टे. | गु.र.नं.व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला तारीख वेळ | गुन्हा दाखल तारीख वेळ | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | खल्लार | 49/24 कलम 324, 504 भादवी | ग्राम लाखनवाडी | 29/02/24 चे 14/00 वा | 29/02/24चे 20/00 वा | महिला वय 31 वर्श | अर्जुन उत्तमराव वरघट वय 52 वर्श रा लखनवाडी<br>**आरोपी अटक नाही** | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फीर्यादी व आरोपी हे शेजारी शेजारी राहत असुन त्यांच्यात नेहमी त्यांचे लहाण मुलांचे कारणावरुन किरकोळ वाद होत होते नमुद घ ता वेळी व ठीकाणी फीचे मुलाने आरोपी चे घराजवळची तुराटी घेतली त्यावर आरोपी ची मुलगी फी चे मुलाला रागावली तर फी ने म्हटले की, मुल खेळतच असतात या कारणावरुन सदर आरोपी याने फी ला काहीही न विचारता तु माझे मुलीला का बोलली , का रागावली असे म्हणुन फीचे हातावर काठीने मारले व शिवीगाळ केली अशा फी चे जबानी रि. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुण तपासात घेतला. |
| 2 | खोलापुर | 36/24 कलम 379 भादवी | खोलापुर ते नावेड रोड | 28/2/24 चे 16/00 वा ते दि. 29/02/24 चे सकाळी 08.30 वा दरम्यान | 29/2/24 चे 14/37 वा दरम्यान | अमोल मधुकर नागे वय 38 वर्ष रा खोलापुर नावेड | अज्ञात<br>**आरोपी अटक नाही** | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फि हा शेत मालक डॉ. यांचे कडे दिवाणजी म्हणुन काम पाहतो. यातील शेत मालक यांचे शेतात ठेवलेले तुरीचे कुटार 5 टन कि अं.12000 रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने घटना ता वेळी चोरून नेले अश्या फिर्यादी यांचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 3 | तिवसा | 108/2024 कलम 394, 392 34 भा द वी सह कलम 4,25 आर्म ॲक्ट | अमरावती ते तिवसा नागपुर हायेववरील श्रीकृष्ण पेट्रोलपंप तिवसा | 28/02/2024 चे 23.00 वा ते 23.15 वा | 29/02/024 चे 01.58 वा | किशोर गुणवंतराव गुल्हाणे वय 40 वर्ष रा बाजार लाईन तिवसा | अनोळखी 04 इसम<br>**आरोपी अटक नाही** | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा एकटाच ऑफिस मध्ये बसलेला असतांना 04 अनोळखी आरोपींनी तोंडाला कपडा बांधुन दोन इसमांचे हातात कोयता घेवुन फिर्यादीच्या खिशातील पेट्रोलपंपचे 7900 रू व स्वत चे 2000 रू असा एकुण 9900 रू माल बळजबरीने काढुन घेतला फि ने प्रतिकार केला असता फिर्यादीला कोयत्याने डाव्या हातावर व डाव्या पायावर मारून जखमी केले तसेच फि चा मोबाईल व सि सी टी व्ही कॅमरे व मॉनीटर फोडले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून व मेडी सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 4 | तिवसा | 110/24 कलम 324, 504, भादवी | शिरजगाव मोझरी | 29/02/24 चे 13.00 वा | 29/02/24 चे 17.07 वा | योगेश रामदासजी जंवजाळकर वय 28 वषे रा शिरजगाव मोझरी | चंद्रवदन उर्फ कपील भिमरावजी खोब्रागडे वय 33 वर्षे रा शिरजगाव मोझरी<br>**आरोपी अटक** | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकानी फिर्यादी हा सेंट्रींगचे काम करीत असतांना आरोपी हा त्याचे जवळ आला व फिस म्हणला की माझी सेंट्रींगची टॉमी दे तर फी याने संध्याकाळी देतो असे म्हटले असता आरोपीने त्यास शिवीगाळ केली व लोंबाझोंबी करून आरोपी याने त्याचे हातातील कळ काढुन फिर्यादीचे तोंडावर व नाकावर मारले त्यामुळे फि चे नाकातुन रक्त निघाले अशा फि चे जबानी रिर्पोट वरून व मेडी |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | **नाही** | सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 5 | तिवसा | 111/24कलम 324, 504, 506 भादवी | शिरजगाव मोझरी | 29/02/24 चे 13.00 वा | 29/02/24 चे 17.20 वा | चंद्रवदन उर्फ कपील भिमरावजी खोब्रागडे वय 33 वर्षे रा शिरजगाव मोझरी | योगेश रामदासजी जंवजाळकर वय 28 वषे रा शिरजगाव मोझरी<br>**आरोपी अटक नाही** | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकानी यातील आरोपी हा शेंट्रींगचे काम करीत असतांना रोडवर दिसल असता त्यास फि ने मी दिलेले सेंट्रींगचे सामान व कामाचे उरलेले पैसे मागीतले असता आरोपी याने कायचे सामान माझे कडे काही नाही असे म्हणुन शिवीगाळ केली व लोंबाझोंबी करून बाजुला पडलेला विटीचा तुकडा उचलुन फिचे डोक्यावर व नाकावर मारून जखमी केली व पुन्ह पैसे मांगीतले तर मारण्याची धमकी दिली अशा फि चे जबानी रिर्पोट वरून व मेडी सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 6 | दर्यापुर | 131/24 कलम 354 452 भादवि सह कलम 3 (1)(w) (i) (ii) 3(2)(va)अ .जा .अ .ज अधि कायदा | पोस्टे दर्यापुर परीसर | 28/02/2024 चे 22/30 ते 22/40 वा सुमारास | 29/02/2024 चे 03/08 वा सुमारास | महिला वय40 | धनराज पुंडलीक खत्री वय 30 रा बनोसा ता . दर्यापुर जिल्हा अमरावती<br>**अटक साना** क .29/2/24 चे साना क 08/24 चे 05/02 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही घरी हजर असतांना यातील आरोपी हा तिचे घरी आत घुसला व काहीही न बोलता अचानक फिची वाईट उददेशाने छेडछाड केली फिने ओरडा ओरडा केला म्हणुन यातील आरोपी हा पडुन गेला परंतु फिचे राहणारे शेजारी यांनी नमुद आरोपी याला पकडुन पोस्टेला आणले अशा फिचे जबानी रिर्पोट वरुन व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. |
| 7 | लोणी | 69/24 कलम 324 504 506 भादवि | ग्राम काजना | 29/02/2024 चे 16.00ते 16.16 वा दरम्यान | 29/02/24 चे 19.58 वा | उध्दवराव रामचंद्र वानखडे वय 60 वर्श रा काजना | सचिन उध्दव वानखडे वय 37 वर्श रा काजना<br>**आरोपी अटक नाही** | हकीकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी व आरोपी हे वडील व मूलगा असून ते एकत्र राहतात यातील आरोपी हा दारू पिण्याचा सवई चा आहे घ ता वेळी व ठिकानी फिर्यादि हे घरी हजर असता तेव्हा यातील आरोपी याला फिर्यादि यानी म्हटले की घरचे प्लास्टीकचे टोपले काय केले असे विचारले असता आरोपी याने माहीत नाही असे म्हणून शिविगाळ केली व मारण्याची धमकी दिली व बाजूला ठेवलेली काठीने फिर्यादि ला डावे कानावर मारली त्यामुळे कानाला जखम होउन रक्त निघाले अशा फिर्यादि च्या जबानी रिर्पाट वरून मेडी र्सटि वरून सदर चा गून्हा दाखल करून तपासात घेतला |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | लोणी | 70/24 कलम 325.504. 506 भादवी | ग्राम बेलोरा | 24/02/2024 चे 21.15 वा ते 21.30 वा दरम्यान | 29/02/24 चे 21.12 वा | अनूराग सुरेश सवई वय 32 वर्श रा बेलोरा | धिरज अशोकराव गायकवाड वय अंदाजे 25 वर्श रा बेलोरा **आरोपी अटक नाही** | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादि व आरोपी हे एकाच गावातील रहीवासी असुन यातील फिर्यादी हे गावातील पानटपरी वर बसले असता यातील आरोपी हा आला व फिर्यादीस म्हटले की , तु मला पाहुन कशाला शिवीगाळ केली असे म्हणुन फिर्यादी सोबत वाद केला व शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली तसेच बाजुला पडलेली काठी हातात घेवुन फिर्यादीच्या उजव्या हाताच्या मनगटावर मारली तेव्हा गावातील अर्जुन तसरे यांनी वाद सोडवला व फिर्यादी हे घरी निघुन गेले असता त्याचे हाताला सुज आली तेव्हा फिर्यादी हे ईलाजाकरीता सामान्य रूग्नालय अमरावती येथे गेले व तेथे डॉक्टर साहेब यांनी तपासुन एक्स रे काढला असता हाताला फॅक्चर असल्याने फिर्यादी हा आज रोजी पो स्टे ला आला व आरोपी विरूदध रीर्पोट दिल्याने व वैदयकीय अहवाल प्राप्त झाल्याने फिर्यादीच्या जबाणी रीपोर्ट वरून व वैदयकीय अहवालावरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 9 | चांदुर रेल्वे | 125/24 कलम 457, 380 अ भादवि | पाथीकर कॉलनी चांदूर रेल्वे | 28/02/24ते 29/02/24 चे 23.30वा ते 02.45वा दरम्यान | 29/02/24चे 10.48वा | जयराज हरीनारायण टावरी वय 50 धंदा व्यापारी रा पाथीकर कॉलनी चांदूर रेल्वे | अज्ञात **आरोपी अटक नाही** | हकिकत अशाप्रकारे आहे की फी कडे 5 रूम चे मकान आहे 2 रूम मध्ये खरेदी विक्री केलेले अनाज जमा करते व 3 रूम मध्ये फी राहते नमुद घ ता वेळी फी चे घरचे जेवण करून झोपले असता रात्री 02.45 वा झोपेतुन उठले असता त्यांना रूममधील लोखंडी कपाट उघडले दिसले कपाटाची पाहणी केली असता त्यामध्ये चांदीचे 14 गोल शिक्के 60 ग्रॅम व 2 तोळे जुनी चांदी 13000 व जुना वापरता मोबाइल फोन किं 500रू भारतीस रूपया 45000 असा एकुण 58,500रू चा माल दिसुन आला नाही कोणीतरी अज्ञात चोराने घराचे खिडकीचा दुसरा पल्ला उघडुन लाकडी काठीला आकोडा बांधुन घराच्या दरवाज्याचा कोंडा उघडुन आतमध्ये प्रवेश करून एकुण 58000 रू चा माल अज्ञात चोरटयाने चोरून नेला. `अशा फी च्या जबानी रपार्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 10 | **मोर्शी** | **94/24 कलम 379 भादवी** | मौजा शाईपुर शेतशिवार 2 किमी उत्तर | **27/02/24 चे 08/00 ते दि. 29/02/024 चे 17/00वा दरम्यान** | **29/02/24 चे 18/53 वा** | **ओमप्रकाश महादेवराव वाडीभस्मे वय 50 वर्श धंदा.नोकरी रा.गबने ले आउट मोर्शी** | अनोळखी **आरोपी अटक नाही** | **हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फि याचे शेतातील पिकाला पाणी देण्यासाठी शेतात विहीरीवर मोटार पंप बसविलेली आहे.नमुद घ ता वेळी व ठिकाणी विहीरीवरील 140 फुट मोटरपंपाचा केबल कि अं 3000/रूचा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.** |
| 11 | परतवाडा | 145/24 कलम 420,417 भादवी 66 (M ) माहिती तंत्रज्ञान अधि | फिर्यादीचे राहते घर घामोडिया | 05/12/23 चे 11/00 वा ते दि 29/02/2024 चे 13/00 | 29/02/24 चे 15/37 वा | आशिष महादेवराव बोबडे वय 44 वर्ष रा घामोडिया | अज्ञात **आरोपी अटक नाही** | हकिकत अशा प्रकारे आहे की, नमुद घता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा Fourth Indian Stock Market Analyasis and Learning Group मध्ये जाईट होवुन नफयाचा आश्वासन देवुन फिर्य़ादीने पैस लागत केली व 'शेयर्स विकत घेतली व शेयर्सचा बॅक खात्यावर 31,35000 रु शेयर्स खरेदी केली सदर |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | व | | वा दरम्यान | | प्लॉट परतवाडा | | स्टॉक मार्केट मध्ये दिलेल्या रकमेची फसवणुक करण्यात आली अशा फिर्यादीचे लेखी रिर्पोट वरुन सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 12 | परतवाडा | 146/24 कलम 363 भा द वि | बस स्टॅंड परतवाडा | 29/02/24 चे 11/30 वा ते 14/30 वा दरम्यान | 29/02/24 चे 16/51 वा | मुन्ना भुता कास्देकर वय 45 वर्ष रा रंभा मध्यप्रदेश भैसदेहि | रामेश्वर रंगराव किरडे वय 20 वर्ष रा करतवाळी रेल्वे चौदा बाजार ता. अकोट जि.अकोला<br>**आरोपी अटक नाही** | हकिकत अशा प्रकारे आहे की, नमुद घता वेळी व ठिकानी यातील फिर्यादी व आरोपी हे दहिहांडा जिल्हा अकोला येथे विट भटटीवर कामावर होते फिर्यादीला त्याचे गावामध्ये हरबरा पिक काढण्याकरिता गावाला जायचे असल्याने एस टी बसने परतवाडा डेपो येथे मुलासह आल्यावर बस स्टॅन्ड येथुन यातील आरोपीने फि ची मुलगी सोना हिला मोटार सायकलवर बसुन घेवुन पळुन गेला अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 13 | शेघाट | 99/24 कलम 363 भादंवि | भवानीडोह ता.वरूड | 27/02.2024 चे 18.00वा. | 29/02/24 चे 14.25 वा. | राजु शोभिराम उईके वय 39 वर्श रा. भवानीडोह ता. वरूड | अज्ञात<br>**आरोपी अटक नाही** | हकीकत अशाप्रकारे आहे कि,फिर्यादीच्या दुस–या पत्नीचे व फि.च्या मुलीचे एकमेकांसोबत पटत नसुन नेहमी वादविवाद करतात. नमुद घ ता वेळी व ठिकाणी या यातील फि.च्या दुस–या पत्नीने फि.च्या पहील्या पत्नीचा मुलगी वय 17वर्श ही घराचे कामधंदे करीत नाही म्हणुन वाद केला या कारणावरून त्यामुळे फि.ची मुलगी ही रागाच्या भरात निघुन गेली असावी किंवा कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणाने फुस लावुन पळवुन नेले असावे.अशा रि.वरून गुन्हा नोंद |
| 14 | शिरखेड | 81/24 कलम 363 भादवी | पोस्टे शिरखेड परीसर | 28/02/.2024 चे 14/00 वा. दरम्यान | 29/02/.2024 चे 17/45 वा. | महिला वय 40 वर्श | अज्ञात<br>**आरोपी अटक नाही** | हकिकत अशा प्रकारे आहे की, घ.ता.वेळी. व ठिकाणे फिची मुलगी वय 17 वर्श 9 महिणे रा.विचोरी हि कोणालाही न सांगता घरुन निधुन गेली . गावात व नातेवाईका कडे शोघ घेतला असता मिळुन आली नाही.फिचे जबानी रिपोर्ट वरून गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 15 | तळेगाव द | 62/24 कलम 379 भादवी | ग्राम घुईखेड बेंडोजीबाबा विद्यालय 10 किमी पश्चिम | 18/02/24 चे 18.00 वा ते 18/02/24 चे 19.00 वा | 29/02/24 चे 13.17 वा | अतुल विनोदराव देशमुख वय 30 रा मांजरखेड ता. चांदुर रे. | अज्ञात<br>**आरोपी अटक नाही** | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी ने त्यांची मोसा क्र एम.एच. 27 बी.एस. 3989किंमत 10000 रू ही नमुद घटनास्थळी ठेवली व यात्रा करायला गेले. यात्रा करून परत आल्यानंतर त्यांना त्यांची मोसा ही घटनास्थळी दिसली नाही. शोध घेतला असता, मिळून आली नाही. अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | दर्यापुर | 136 / 24 कलम 279,337, 304,अ भादवि | गोळेगाव फाटयाजवळ | 29 / 02 / 2024 चे 20 / 00 ते 20 / 10 वा सुमारास | 29 / 02 / 2024 चे 23 / 11 वा सुमारास | आरीफ शाहा युसुफ शाहा वय 40 रा मोमीनपुरा दर्यापुर धंदा चालक | मोसा क्र एम एच 30बी एन 6457 चा चालक<br>**आरोपी अटक नाही** | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी चा चुलत भाउु मृतक नामे याकुब 'शाहा अयुब शाह वय 40 रा मोमीनपुरा दर्यापुर जात 'शाहा धंदा चालक ॲटो क्र एमएच 27 एआर 2824 चालक हे त्यांचा ॲटो दुरूस्त करत असतांना नमुद मोसा क्र एमएच 30 बीएन 6457 चा चालक आरोपीने त्याचे वाहन ॲटोस भरधाव वेगाने व लापरवाहिने चालवुन ॲटोस मागुन जबर ठोस मारून ॲटो चालकाचे मरणास व ॲटो मधील इतर प्रवाशी जख्मी होण्यास व आरोपी मोसा चालक हे स्वतःजख्मी होवुन सदर अपघातास आरोपी हा कारणी भुत ठरला व फिचे जबानी रि व मेमो प्राप्त वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |

**पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण**
करीता